# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : तक्रार क्र. -७८९/२०२१

**तक्रारकर्ता,** श्री.जगन्नाथ पोसू पाटील

रा.गणेशपुरी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४०१ २०६.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गणेशपुरी ता.भिवंडी, जि.ठाणे ४०१ २०६

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गणेशपुरी ता.भिवंडी, जि.ठाणे ४०१ २०६

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१२.२०२१ | १२.१.२०२१ | ११.२.२०२१ | १२.३.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२२.३.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद नारायण भोईर, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गणेशपुरी हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (सन २०१६ जानेवारी ते डिसेंबर २०२० मधील ग्रामपंचायत गणेशपुरीचे ऑडिट झाले आहे त्या ऑडिटचे रिपोर्ट तपशिल, अहवाल व इतर संबंधी सर्व माहिती मिळावी.) "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती देण्यास टाळाटाळ करणेबाबत." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शुल्काची रक्कम भरणा करण्याबाबत तक्रारकर्ता यांना कळविले होते. तथापि, ती भरण्यात आली नाही.

त्यानंतर झालेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.१२.३.२०२१ रोजी सुनावणी घेऊन फी ची रक्कम शासीकय कोषागारामध्ये जमा न करता ग्रामनिधीमध्ये जमा करण्याबाबत आदेशित केले. त्यानंतरदेखील शुल्क न भरल्यामुळे तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांना शासकीय कोषागारात रक्कम भरणा करण्याबाबत कळविले होते. परंतु, ती ग्रामनिधीमध्ये भरणा करण्यास कळविले. त्यामुळे ती माहिती तक्रारकर्ता यांना देण्यात आलेली नाही. व त्यामुळे यामध्ये ३० दिवसांचा कलावधी निघून गेलेला आहे. सबब, हा कालावधी गेला असल्यामुळे सदरची संपूर्ण माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांना पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गणेशपुरी यांनी **तक्रारकर्ता यांना संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ मे, २०२४

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**